# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी

**प्रस्तावना**

**विषय:-** प्रारूप सुधारित विकास योजना भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका जि. ठाणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २८ (३) अन्वये नियोजन समितीस मुदतवाढ देणेबाबत...

**संदर्भ:-** सर्व नियोजन समिती सदस्य यांचा दि. २०/३/२०२४ रोजीचा विनंती अर्ज.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम २६(१) मधील तरतूदीनुसार भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका हद्दीची प्रारुप विकास योजना तयार करुन त्यासंबधीची सूचना उक्त अधिनियमाच्या कलम २६(१) अन्वये दिनांक १२/१०/२०२३ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द केली आहे.

उपरोक्त सूचनेच्या अनुषंगाने प्राप्त हरकती/सूचना धारकांना सुनावणी देण्यासाठी उक्त अधिनियमाचे कलम २८(२) अन्वये सूचना क्र. तांत्रिक/संसनर/वियोविध/भिनिश मनपा/३६४, दि. २४/०१/२०२४ अन्वये गठीत झालेली आहे.

उक्त अधिनियमाचे कलम २८(३) अन्वये नियोजन समितीची नियोजन प्राधिकरणास प्राप्त हरकती/सूचनांवर सुनावणी देऊन अहवाल सादर करण्याची मूळ मुदत दोन महिने म्हणजेच दि. २३/०३/२०२३ पावेतो आहे.

मात्र उक्त नियोजन समितीने प्रसिद्ध प्रारूप विकास योजनेवर प्राप्त हरकत/ सुचनांची संख्या विचारात घेऊन त्यांचेकडील दि. २०/०३/२०२३ रोजीच्या पत्रान्वये अधिनियमाच्या कलम २८(३) मधील तरतुदीनुसार प्राप्त हरकती/सूचनांचा सुनावणी अहवाल सादर करण्यासाठी दि. २४/०३/२०२४ ते २२/०५/२०२४ पर्यंतची २ महिन्याची मुदतवाढ पत्रात नमूद कारणास्तव मंजूर होण्यास विनंती केलेली आहे. सद्या मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नाहीत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार प्रशासक या नात्याने आयुक्त, भि.नि.श.म.न.पा. पाहत आहेत. विषयांकित प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

**प्रशासकिय ठराव क्र.** ४३५ **दि.** 23 /03 /२०२४

नियोजन समितीने पत्रात नमूद केलेली कारणमिमांसा व त्यावर विभागाकडुन प्रस्तावित करण्यात आल्यानुसार भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या प्रारुप सुधारित विकास योजना कर्यवाही अनुषंगाने गठित क्रण्यात आलेल्या नियोजन समितीला मुदतवाढ मंजुर करणे आवश्यक असल्याने उक्त नियोजन समितीला प्राप्त हरकती/सूचनांचा सुनावणी अहवाल सादर करण्यासाठी, कलम २८(३) अन्वये दि. २४/०३/२०२४ ते २२/०५/२०२४ पर्यंतची २ महिन्याची मुदतवाढ या ठरावाव्दारे मंजूर करण्यात येत आहे.

(अजय विलास वैद्य)
प्रशासक तथा आयुक्त,
भिवंडी नि. श. महानगरपालिका,
भिवंडी.

26/3/24

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.

## पाणी पुरवठा विभाग

**विषय :- सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता भिवंडी महानगरपालिकेच्या हद्दीतील गौतम कंपाऊंड नविवस्ती, शांतीनगर, पोगांव, नुरीनगर, आझाद नगर क्लोरिनेशन प्लॅन्ट व वऱ्हाळा जलशुद्धीकरण केंद्राची वार्षिक देखभाल, निगा व दुरुस्ती करीता मजुर सेवा पुरविणे बाबत प्रस्तावाच्या प्राप्त दरांना प्रशासकिय मान्यता मिळणे बाबत.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या हद्दीत गौतम कंपाऊंड नवीवस्ती (२५ एम.एल.डी.), शांतीनगर (१५ एम.एल.डी.), पोगांव (२ एम.एल.डी.) नुरीनगर (२ एम.एल.डी.), व आझाद नगर (२ एम.एल.डी.) असे एकुण ५ क्लोरीनेशन प्लॅन्ट आहेत. सदर प्लॅन्टद्वारे बृहन्मुंबई महानगरपालिके कडून घेण्यात येणाऱ्या पिण्याच्या पाण्याला क्लोरिन गॅसचा डोस देण्यात येतो. यापुर्वी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या तानसा मुख्य जलवाहिनी वरुन होणाऱ्या पाणी पुरवठ्या करीता योग्य प्रमाणात क्लोरिन गॅसची मात्रा बृहन्मुंबई महानगरपालिकेकडुन देण्यांत येत होती. परंतु बृहन्मुंबई महानगरपालिकेची नविन जलवाहिनीवरुन पाणी वितरण व्यवस्था सुरु झाल्याने सदर पाण्यास क्लोरिनची मात्रा निरंक आहे. त्याकरीता वरील नमुद ठिकाणी होणाऱ्या पाणी पुरवठ्याकरीता क्लोरिनची मात्रा देणे आवश्यक व तातडीचे आहे. जेणे करुन होणाऱ्या पाणी पुरवठ्याद्वारे रोगराई पसरणे तसेच पावसाळ्याच्या दिवसांत पाण्यामुळे होणारे साथीचे रोग पसरण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे व-हाळदेवी येथील ५ एम.एल.डी. जलशुध्दीकरण केंद्रातून दररोज भिवंडी शहरांतील काही भागांत पाणी पुरवठा करण्यांत येतो, जलशुध्दीकरण केंद्राची दैनंदिन देखभाल,निगा व दुरुस्ती तसेच जलशुध्दीकरणांत होणारी पंपींग, व-हाळा जी.एस.आर.पातळीची तपासणी करणे इत्यादी कामे करणे करीता कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे.

सदर क्लोरिनेशन प्लॅन्ट व जलशुद्धीकरण केंद्रामध्ये मनपाचे कर्मचारी कार्यरत होते. परंतू काही कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत सदर क्लोरिनेशन प्लॅन्ट व जलशुद्धीकरण केंद्रामध्ये मोटार चालू करणे, मोटार बंद करणे, क्लोरिन गॅस सिलेंडर लावून क्लोरिनेशनचा डोस देणे व दर तासाला ओटी टेस्ट करणे, इत्यादी कामे करण्यासाठी मनपाचे कर्मचारी उपलब्ध नाहीत. तरी क्लोरिन प्लॅन्ट चालविणे कामी अडथळे निर्माण होत आहेत. तसेच क्लोरिनेशन प्लॅन्टची माहिती असलेले कर्मचारी मनपा आस्थआपनाकडे उपलब्ध नाहीत. त्यामुळे क्लोरिन प्लॅन्ट व जलशुद्धीकरण केंद्र चालू ठेवून भिवंडी शहराला शुद्ध पाणी पुरवठा करणे जरुरीचे आहे. तरी सदर प्लॅन्टवर तीन शिफ्टमध्ये १) गौतम कंपाऊंड नविवस्ती - ६ कामगार, २) शांतीनगर - ६ कामगार, ३) पोगांव - ४ कामगार, ४) नुरीनगर - ४ कामगार ५) आझाद नगर - ४ कामगार व ६) वराळा जलशुद्धीकरण केंद्र - ६ कामगार असे एकुण ३० कामगार कर्मचाऱ्यांची अत्यंत आवश्यकता आहे.

तसेच भिवंडी महानगरपालिकेच्या शेजारी असणाऱ्या महानगरपालिकांकडून माहिती घेतली असता सदर महानगरपालिकांच्या क्लोरिनेशन प्लॅन्ट तसेच जलशुद्धीकरण केंद्राची वार्षिक देखभाल, निगा व दुरुस्ती खाजगी ठेकेदारांमार्फत काम करण्यात येत आहे.

तसेच भिवंडी महानगरपालिकेच्या शेजारी असणाऱ्या महानगरपालिकांकडून माहिती घेतली असता सदर महानगरपालिकांच्या क्लोरिनेशन प्लॅन्टची निगा, दुरुस्ती व वार्षिक देखभाल खाजगी ठेकेदारांमार्फत काम करण्यात येत आहे.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिके अंतर्गत ठेकेदारांद्वारे करण्यांत येणाऱ्या कामावर कंत्राटी पद्धतीने काम करण्याऱ्या कामगारांना शासकिय नियमानुसार किमान वेतन लागू करणे आवश्यक आहे. सदर कामगारांना किमान वेतन लागू न केल्यास मुळ मालकांवर फौजदारी गुन्हा दाखल करणेची तरतूद आहे. त्यामुळे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागात काम करणाऱ्यां कंत्राटी कामगारांना किमान वेतन लागू करणे आवश्यक आहे. तसेच शासन निर्णयानुसार मुळ वेतन व विशेष भत्त्यांमध्ये वाढ झाल्यास कंत्राटी कामगारांना मुळ वेतन व विशेष भत्ता देय असणार आहे.

त्याकरीता मा. सहा. कामगार आयुक्त सो. भिवंडी यांचे कडुन कंत्राटी पद्धतीने / ठोक वेतनावर अर्धकुशल व अकुशल कामगारांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन देणेबाबत प्रचलित शासन निर्णयाप्रमाणे मुळ वेतन व विशेष भत्ता मिळुन वेतन निश्चित करणे बाबत नविन दर प्राप्त करुन त्यास दि.१५/०२/२०२४ अन्वये मा. आयुक्त सो. यांची मंजुरी प्राप्त झालेली आहे. त्यानुसार सदर कामाकरीता ₹१,२७,०१,४९१/- मात्रचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे.

उपरोक्त कामाकरीता ₹१,२७,०१,४९१/- मात्रचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असुन प्रशासकिय ठराव क्र. ४००, दि.०७/०३/२०२४ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे. त्यानुसार दै.वृत्तपत्रात तसचे महा-ई-टेंडर्स या संकेतस्थळावर प्रसिद्ध करुन (१२ महिन्यांकरीता) ई-निविदा मागविण्यात आली असता एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या असुन त्यांचा तौलानिक तक्ता खालील प्रमाणे आहे.

१. मे. अचला इंजिनिअरिंग अॅण्ड इलेक्ट्रॉनिक्स - अंदाजपत्रकीय दरांपेक्षा २.५६ % कमी दराने
२. मे. हिंदुस्तान इंटरप्राईजेस - अंदाजपत्रकीय दरांप्रमाणे
**३. मे. राम दशरथ कोरे - अंदाजपत्रकीय दरांपेक्षा ६.०१% कमी दराने**

वरील प्राप्त दरांपैकी **मे. राम दशरथ कोरे** यांची निविदा सर्वात कमी दरांचे म्हणजेच अंदाजपत्रकीय दरांपेक्षा ६.०१०% कमी दरांची रक्कम रु.१,१९,३८,१३१/- मात्रची प्राप्त झालेली आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदेतील प्राप्त दर |
|---|---|---|
| १ | **सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता भिवंडी महानगरपालिकेच्या हद्दीतील गौतम कंपाऊंड नविवस्ती, शांतीनगर, पोगांव, नुरीनगर, आझाद नगर क्लोरिनेशन प्लॅन्ट व वऱ्हाळा जलशुद्धीकरण केंद्राची वार्षिक देखभाल, निगा व दुरुस्ती करीता मजुर सेवा पुरविणे बाबत प्रस्तावाच्या प्राप्त दरांना प्रशासकिय मान्यता मिळणे बाबत.** | **रु.१,१९,३८,१३१/-** |

सद्य कालावधीत मा. महासभा व मा. स्थायी समिती संपुष्टात आलेली आहे. शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक यांना आहेत.

उपरोक्त नमुद पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता भिवंडी महानगरपालिकेच्या हद्दीतील गौतम कंपाऊंड नविवस्ती, शांतीनगर, पोगांव, नुरीनगर, आझाद नगर क्लोरिनेशन प्लॅन्ट व वऱ्हाळा

जलशुद्धीकरण केंद्राची वार्षिक देखभाल, निगा व दुरुस्ती करीता मजुर सेवा पुरविणे बाबतच्या (१२ महिन्यांकरीता) कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता प्राप्त झाली असुन मे. राम दशरथ कोरे यांच्या अंदाजपत्रकीय दरांपेक्षा ६.०१०% कमी दरांच्या निविदा रक्कम रु.१,१९,३८,१३१/- मात्रच्या दरांना मंजुरी देणे बाबतचा प्रस्ताव.

**प्रशासकिय ठराव क्रमांक :** ४३४ **दिनांक :** १६/०३ / **२०२४**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता भिवंडी महानगरपालिकेच्या हद्दीतील गौतम कंपाऊंड नविवस्ती, शांतीनगर, पोगांव, नुरीनगर, आझाद नगर क्लोरिनेशन प्लॅन्ट व वऱ्हाळा जलशुद्धीकरण केंद्राची वार्षिक देखभाल, निगा व दुरुस्ती करीता मजुर सेवा पुरविणे बाबतचा (१२ महिन्यांकरीता) प्रस्ताव कार्यकारी अभियंता व अति. आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४, दि.०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता भिवंडी महानगरपालिकेच्या हद्दीतील गौतम कंपाऊंड नविवस्ती, शांतीनगर, पोगांव, नुरीनगर, आझाद नगर क्लोरिनेशन प्लॅन्ट व वऱ्हाळा जलशुद्धीकरण केंद्राची वार्षिक देखभाल, निगा व दुरुस्ती करीता मजुर सेवा पुरविणे बाबत (१२ महिन्यांकरीता) मे. राम दशरथ कोरे यांची अंदाजपत्रकीय दरांपेक्षा ६.०१०% कमी दरांची निविदा रक्कम **रु.१,१९,३८,१३१/-** मात्रच्या प्राप्त दरांना प्रशासकिय मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**

**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.**

**पाणी पुरवठा विभाग**

**विषय :- सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता मनपा कार्यक्षेत्रात प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वात असलेल्या पाईप लाईन निगा व दुरुस्ती कामाकरीता साहित्य पुरविणे कामाकरीता प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणेबाबत.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे क्षेत्रफळ २६.५ चौ. कि.मि. इतके आहे. मनपा कार्यक्षेत्रामध्ये ३४८ कि.मी. इतक्या लांबीच्या वेगवेगळ्या व्यासाच्या जलवाहिन्या ३० ते ३५ वर्ष जुन्या आहेत. सदर जलवाहिन्यांच्या निगा व दुरुस्तीचे कामकाज वार्षिक ठेकापध्दतीने ठेकेदारा मार्फत करुन घेतले जाते.

मनपाच्या कार्यक्षेत्रात दररोज व्हॉल्व नादुरुस्तीच्या, पाईपलाईन लिकेज, नळाद्वारे येणारे घाण पाणी, पाईपलाईन चोकअप इत्यादी प्रकारच्या तक्रारी येत असतात सदर तक्रारींचे निवारण वेळेच्या वेळी करावे लागते तसेच नागरीकांच्या प्रत्यक्ष व फोन वरुन दैनंदिन प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे निवारण करावे लागते व पाणी पुरवठा सुरळीत ठेवावा लागतो. मनपा कार्यक्षेत्रामध्ये शांतीनगर, व-ळा जी.एस. आर, नारपोली जी.एस.आर., कामतघर, आझादनगर, एस.टी. स्टॅण्ड ई.एस.आर, आय.जी.एम. ई.एस.आर., नागांव, नेहरु नगर, नवी वस्ती व कोंबडपाडा इत्यादी ठिकाणी झोन निहाय जलकुंभाद्वारे व बायपास जलवाहिनीद्वारे पाणी पुरवठा केला जातो. सदर झोन निहाय पाणी पुरवठा करणा-या व्हॉल्व पूर्णतः खराब झाल्यास किंवा बिघाड झाल्यास तातडीने दुरुस्ती करणे किंवा आवश्यक असल्यास नविन व्हॉल्व बसविणे गरजेचे असते तसेच शहरातील मुख्य वितरण वाहिन्या नादुरुस्त होऊन गळती झालेस तातडीने जलवाहिनी दुरुस्तीकामी स्पेशल्स, व्हॉल्व, टी, रेडूसर, जीपी जॉईन्ट व इतर सुटे किरकोळ साहित्याची आवश्यकता भासते. तसेच गणमेटल, चेकनट, स्पींडलचे दर जिल्हा दरसुचीमध्ये उपलब्ध नसल्याने दरपत्रक मागवुन सदरचे दर बाजार भावाप्रमाण घेण्यात आलेले आहेत.

सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता पाणी पुरवठा पाईप खरेदी बसविणे निगा व दुरुस्ती या लेखाशिर्षकाच्या अधिन राहून मनपा कार्यक्षेत्रात प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वात असलेल्या पाईप लाईन निगा व दुरुस्ती कामाकरीता साहित्य पुरविणेकामी रु.९६,४४,७६३/- मात्रचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले सदर अंदाजपत्रकास दिनांक ११/०३/२०२४ अन्वये प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळालेली आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | **सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता मनपा कार्यक्षेत्रात प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वात असलेल्या पाईप लाईन निगा व दुरुस्ती कामाकरीता साहित्य पुरविणे बाबत.** | रु. ९६,४४,७६३/- |

शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक यांना आहेत.

उपरोक्त नमुद सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता मनपा कार्यक्षेत्रात प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वात असलेल्या पाईप लाईन निगा व दुरुस्ती कामाकरीता साहित्य पुरविणे बाबतचा प्रस्ताव.

**ठराव क्रमांक :** ४३२ **दिनांक :** १५ /०३ / **२०२४**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता मनपा कार्यक्षेत्रात प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वात असलेल्या पाईप लाईन निगा व दुरुस्ती कामाकरीता साहित्य पुरविणे बाबत कार्यकारी अभियंता व अति. आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. . एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषतः कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता मनपा कार्यक्षेत्रात प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वात असलेल्या पाईप लाईन निगा व दुरुस्ती कामी साहित्य पुरविणे बाबतच्या रु.९६,४४,७६३/- मात्रच्या प्रस्तावास मान्यता देऊन प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देतआहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि. शहर महानगरपालिका,भिवंडी.**

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
## पाणी पुरवठा विभाग

**विषय :- सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वात असलेल्या ड्रेनेज वाहिनी, ड्रेनेज मेनहोल व चेंबर दुरुस्ती करणेच्या ई-निविदेतील कमी दराला प्रशासकीय मान्यता मिळणे बाबत.**

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचे क्षेत्रफळ २६.५ चौ.कि.मी. असुन महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती क्र.१ ते ५ मध्ये अस्तित्वात असलेल्या ड्रेनेज वाहिन्या ब-याच वर्षापुर्वीपासुन अंथरण्यात आलेल्या असल्यामुळे ब-याच ठिकाणी नादुरुस्त होत असतात. तसेच दैनंदिन स्वरुपात ड्रेनेज वाहिन्या चोकअप होत असतात व काही नादुरुस्त झालेल्या ड्रेनेज वाहिन्यावरील प्राप्त होत असल्यामुळे ड्रेनेज वाहिनी वेळीच दुरुस्त करणे आवश्यक आहे.

सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वात असलेल्या ड्रेनेज वाहिनी, ड्रेनेज मेनहोल व चेंबर दुरुस्ती करणे कामी एक वर्षाकरीता रु.३४,७७,९९८/- मात्रची ई-निविदा सुचना क्र.६४ दि.०७/०३/२०२४ ते १४/०३/२०२४ या कालावधीत मनपाच्या महाटेंडर व दै.मुंबई केसरी टाईम्स , व दै. आमची मुंबई या वृत्तपत्रात पसिध्द करण्यांत आली होती. दिनांक १५/०३/२०२४ रोजी ई-निविदा निविदा समिती समोर उघडली असता एकूण २ निविदाकारांच्या निविदा प्राप्त झाल्या असून सार्व. बांध. वि. शासन परिपत्रक क्र.सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२ दि.२९/०१/२०१९ च्या परिपत्रकानुसार प्रथम मागणीवेळी दोनच पात्र निविदा प्राप्त झाल्यास नियमानुसार लिफाफा क्र.२ उघडून पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी असे नमूद असल्याने प्राप्त निविदांची छाननी प्रक्रिया पुर्ण करुन दि.१५/०३/२०२४ रोजी त्याचे प्राईज बीड उघडण्यांत आले असून त्यांचा तौलानिक तक्ता खालील प्रमाणे आहे.

**१) मे. हिन्दुस्तान इंटरप्रायजेस्** - **अंदाजपत्रकीय दराप्रमाणे.**

२) मे. रॉयल कन्स्ट्रक्शन - अंदाजपत्रकीय दरांपेक्षा २.५० टक्के जास्त दरांने.

वरील प्राप्त दरांपैकी **मे. हिन्दुस्तान इंटरप्रायजेस्** यांची निविदा सर्वात कमी दरांचे म्हणजेच अंदाजपत्रकीय दरांची म्हणजेच रक्कम **रु.३४,७७,९९८/-** मात्रची प्राप्त झालेली आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | **सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वात असलेल्या ड्रेनेज वाहिनी, ड्रेनेज मेनहोल व चेंबर दुरुस्ती करणे** | **३४,७७,९९८/-** |

सद्य कालावधीत मा. महासभा व मा. स्थायी समिती संपुष्टात आलेली आहे. शासन आदेश क्र.एम.सी.ओ.-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) नवि-१४ दि. ०६ जून २०२२ रोजी नूसार मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी नि.श.महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामूळे भिवंडी नि.श.महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१ अ) (१ ब) मधील तरतूदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा.प्रशासक यांना आहेत.

सदर कामा करीता मे. हिन्दुस्तान इंटरप्रायजेस् यांचे निविदेतील दर अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच रु. ३४,७७,९९८/- मात्र आहे. तरी सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वात असलेल्या ड्रेनेज वाहिनी, ड्रेनेज मेनहोल व चेंबर दुरुस्ती करणेच्या ई - निविदेतील दरांना मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव.

**प्रशासकीय ठराव क्रमाक:** ४३३ **दिनांक** १५/ ०३ /२०२४

सन २०२४-२०२५ करीता भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वात असलेल्या ड्रेनेज वाहिनी, ड्रेनेज मेनहोल व चेंबर दुरुस्ती करणे बाबत कामास प्रशासकीय,आर्थीक मान्यता मिळणेकामी प्रस्ताव कार्यकारी अभियंता व अति.आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एम सी ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.०६ जून २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ ब) मधील तरतूदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानूसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२४-२०२५ करीता भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वात असलेल्या ड्रेनेज वाहिनी, ड्रेनेज मेनहोल व चेंबर दुरुस्ती करणेच्या निविदेतील दरांना मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
o/c **भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**

विषय :- घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) च्या शासन निर्णयानुसार मा. प्रशासकिय ठराव क्र. ८६, दि.३०/०१/२०२३ अन्वयेच्या मंजुरी नुसार मे. रेयान एंटरप्रायजेस, अंबरनाथ या संस्थेस मुदतवाढ देणे बाबत.

घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत उपविधी नुसार मनपा कार्यक्षेत्रात दंडात्मक कारवाई करणेसाठी मनपा मार्फत नियुक्त कर्मचाऱ्यांमार्फत दि.३१/०३/२०२० ते दि.०९/०६/२०२१ या कालावधीत उपविधी नुसार रु.१०,७२,७५०/- इतका दंड लेखा विभागामध्ये जमा करण्यात आला आहे. तथापि कर्मचारी वर्गाकडुन जमा झालेली दंड रक्कम व त्यांचे मासिक वेतन यांची पाहणी केली असता व मा. आयुक्त सो. यांनी दि.०७/०६/२०२१ रोजी दिलेल्या निर्देशानुसार उपविधीनुसार मनपा कार्यक्षेत्रात कडक कार्यवाही करणेसाठी त्रयस्थ संस्था नियुक्त केल्यास सदर संस्थेमार्फत उपविधीच्या आधारे मनपाचे आर्थिक उत्पन्नामध्ये वाढ होऊन कडक कार्यवाही होईल.

महाराष्ट्र विघटनशील व अविघटनशील कचरा नियंत्रण ठेवणे करीता महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण, दि. २१ एप्रिल २००६ मधील व शासन निर्णय क्र.स्वमअ/-२०१७/प्र.क्र.१२६/नवि-१४, दि.११/०७/२०१९ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ४५० (अ) तसेच महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ च्या कलम ३१२ (अ) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर, शासनाने घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) च्या शासन निर्णयानुसार मा. महासभा ठराव क्र.३, दि.२४/०७/२०१७ अन्वये त्रयस्थ संस्थेमार्फत कार्यवाही करणेसाठी मंजुरी प्राप्त आहे.

त्याअनुषंगाने मनपामार्फत उपविधीनुसार शहरात दंडात्मक कारवाई करणेकामी निविदा प्रक्रियेद्वारे नियुक्त करण्यात आलेले मे. रेयान एंटरप्रायजेस, अंबरनाथ या संस्थेने मा.प्रशाकिय ठराव क्र.८६, दि.३०/०१/२०२३ अन्वयेच्या प्राप्त मंजुरीनुसार जा.क्र.भिनिशमनपा/आरोग्य/१००, दि.०३/०२/२०२३ रोजीच्या कार्यादेशानुसार दि.१०/०२/२०२३ ते दि.०९/०२/२०२४ या कार्यादेशाच्या १ वर्षाच्या कालावधीत उपविधीनुसार दंडात्मक कारवाई करुन रु.१,००,५०,६५७/- इतका दंड वसुल करुन त्यापैकी ५५ टक्के मनपा हिस्सा रु.५५,२७,८६१/- मनपाच्या लेखा विभागाकडे दैनंदिन चलनाद्वारे भरणा केला आहे.

मागील पृष्ठ क्र. एन-५३ वर घनकचरा व्यवस्थापन (व्यवस्थापन व हाताळणी) अंतर्गत उपविधी नुसार दंडात्मक कारवाई करणेकामी प्रशासकीय ठरावा अन्वये मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांनी दिलेल्या मंजुरीनुसार नियुक्त त्रयस्थ संस्था मे. रेयान एंटरप्रायजेस, अंबरनाथ या ठेकेदार संस्थेस जा.क्र.भिनिशमनपा/आरोग्य/१००/२०२३, दि.०३/०२/२०२४ रोजीच्या दिलेल्या कार्यादेशाचा कालावधी दि.०९/०२/२०२४ रोजी संपुष्टात आला असुन ठेकेदार संस्थेने दि.१०/०१/२०२४ रोजीच्या पत्रानुसार १ वर्षाची मुदतवाढ मिळणेकामी विनंती केली आहे. त्याअनुषंगाने मा. उप-आयुक्त सो. (आरोग्य) यांनी ठेकेदार संस्थेस मुदतवाढ न देता नवीन निविदा प्रस्तवित करण्याचे निर्देश दिले आहेत.

परंतू लोकसभा निवडणूक २०२४ ची आचारसंहिता नजीकच्या कालावधीत लागण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांनी दि.१५/०३/२०२४ रोजी मे. रेयान एंटरप्रायजेस, अंबरनाथ या ठेकेदार संस्थेस १ वर्षाची मुदतवाढ देणेकामी मान्यता दिली असल्याने ठेकेदार संस्थेस मागील दिलेल्या कार्यादेशानुसार दैनंदिन केलेल्या दंडात्मक कारवाईचा ४५ टक्के हिस्स्यातून सर्व खर्च भागवणे व ५५ टक्के हिस्सा मनपाच्या लेखा विभागात दैनंदिन स्वरुपात जमा करणे यासाठी ठेकेदार संस्थेस ३ महिने किंवा नवीन निविदा अंतीम होई पर्यंत मुदतवाढ देवून कार्यादेश देणेकामी मा. स्थायी समिती अस्तितवात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ कलम ७३ (क) नुसार संविदा होणेसाठी मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळावी, ही विनंती.

**प्रशासकिय ठराव क्र.** ८२९५.

**दिनांक :-** १५/०३/२०२४

घनकचरा व्यवस्थापन (व्यवस्थापन व हाताळणी) अंतर्गत उपविधी नुसार दंडात्मक कारवाई करणेकामी प्रशासकीय ठरावा अन्वये मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांनी दिलेल्या मंजुरीनुसार नियुक्त त्रयस्थ संस्था मे. रेयान एंटरप्रायजेस, अंबरनाथ या ठेकेदार संस्थेस जा.क्र.भिनिशमनपा/आरोग्य/१००/२०२३,

दि.०३/०२/२०२४ रोजीच्या दिलेल्या कार्यादेशाचा कालावधी दि.०९/०२/२०२४ रोजी संपुष्टात आला असुन ठेकेदार संस्थेने दि.१०/०१/२०२४ रोजीच्या पत्रानुसार १ वर्षाची मुदतवाढ मिळणेकामी विनंती केली आहे. त्याअनुषंगाने मा. उप-आयुक्त सो. (आरोग्य) यांनी ठेकेदार संस्थेस मुदतवाढ न देता नवीन निविदा प्रस्तवित करण्याचे निर्देश दिले आहेत.

परंतू लोकसभा निवडणूक २०२४ ची आचारसंहिता नजीकच्या कालावधीत लागण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांनी दि.१५/०३/२०२४ रोजी मे. रेयान एंटरप्रायजेस, अंबरनाथ या ठेकेदार संस्थेस १ वर्षाची मुदतवाढ देणेकामी मान्यता दिली असल्याने ठेकेदार संस्थेस मागील दिलेल्या कार्यादेशानुसार दैनंदिन केलेल्या दंडात्मक कारवाईचा ४५ टक्के हिस्स्यातून सर्व खर्च भागवणे व ५५ टक्के हिस्सा मनपाच्या लेखा विभागात दैनंदिन स्वरुपात जमा करणे यासाठी ठेकेदार संस्थेस ३ महिने किंवा नवीन निविदा अंतीम होईपर्यंत मुदतवाढ देवून कार्यादेश देणेकामी मा. स्थायी समिती अस्तितवात नसल्याने मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळणेकामी विनंती केली आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एमसीओ२०२०/प्र.क्र.७१(भाग २)/नवि दि.०६/०६/२०२२ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ४५२ अ(१अ) व (१ब) च्या तरतुदी नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार (महासभा व स्थायी समितीचे अधिकार) मी, अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत उपविधी नुसार मनपा कार्यक्षेत्रात दंडात्मक कारवाई करणेसाठी नियुक्त ठेकेदार मे. रेयान एंटरप्रायजेस, अंबरनाथ या ठेकेदार संस्थेस जा.क्र.भिनिशमनपा/आरोग्य/१००/२०२३, दि.०३/०२/२०२३ अन्वये १ वर्षासाठी देण्यात आलेल्या कार्यादेशाच्या अनुषंगाने लोकसभा निवडणूक २०२४ ची आचारसंहिता नजीकच्या कालावधीत कधीही लागणार असल्याने संबंधित ठेकेदार संस्थेस दि.१५/०३/२०२४ रोजी पासुन पुढील ३ महिने किंवा नवीन निविदा अंतीम होईपर्यंत मुदतवाढ देवून कार्यादेश देणेकामी मान्यता देण्यात येत आहे.

(अजय वैद्य)
प्रशासक तथा आयुक्त,
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी**
**बांधकाम विभाग**

**प्रस्तावना:-**

**विषय :-** प्रभाग समिती क्र.४ च्या कार्यक्षेत्रामध्ये कै.परशुराम टावरे क्रिडा संकुलनामधील महानगरपालिका तरण तलाव वापरण्यास सुरु करणेबाबत..

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात प्रभाग समिती क्र.४ च्या कार्यक्षेत्रात कै.परशुराम टावरे क्रिडा संकुलनामधील महानगरपालिका तरण तलाव स्पोर्टीव्ह फिटनेस सेंटर, भिवंडी यांना ३० वर्षाकरीता परिचलन करणेकामी दिलेले आहे. सदर तरण तलावामध्ये अपघात झाल्याने दि.१३.०२.२०१९ रोजी सदर तरण तलाव सिल करण्यात आलेले आहे. सदर तरण तलाव व्ही.जे.टी.आय. अभियांत्रिकी महाविद्यालय, मुंबई यांचे सुरक्षीतता ऑडिट नुसार दुरुस्ती केलेली असल्याने तरण तलाव सुरु करणे, तसेच सन २००८-२००९ ते २०१८-२०१९ या कालावधीतील व्याजाची रक्कम रु.१७,४२,०३२/- दोन वर्षामध्ये दोन सम हप्त्यांमध्ये महानगरपालिकेमध्ये भरण्यास, बंद कालावधी सन २०१९-२० पासून २०२२-२३ पर्यंतचे भाड्याची रक्कम व त्यावरील व्याज रक्कम रु.३४,१५,५४५/- माफ करणेस व बंद कालावधी मधील ५ वर्ष करारनामाच्या मुळ मुदतीतध्ये वाढून देणेकामीच्या प्रस्तावास मा.आयुक्त महोदय यांनी त्यास मान्यता दिलेली आहे. शासन आदेश क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४ दि.०६ जुन २०२ रोजी नुसार मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचा कार्यभार प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार प्रसाकिय ठराव व निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा.प्रशासक सो. यांना आहेत.

ठराव क्र. ८३१ दिनांक :- १५ /३ /२०२४

भिवंडी नि.श.महानगरपालिका कार्यक्षेत्रात प्रभाग समिती क्र.४ च्या कार्यक्षेत्रात कै.परशुराम टावरे क्रिडा संकुलनामधील महानगरपालिका तरण तलाव स्पोर्टीव्ह फिटनेस सेंटर, भिवंडी यांना ३० वर्षाकरीता परिचलन करणेकामी दिलेले आहे. सदर तरण तलावामध्ये अपघात झाल्याने दि.१३.०२.२०१९ रोजी सदर तरण तलाव सिल करण्यात आलेले आहे. सदर तरण तलाव व्ही.जे.टी.आय. अभियांत्रिकी महाविद्यालय, मुंबई यांचे सुरक्षीतता ऑडिट नुसार दुरुस्ती केलेली असल्याने तरण तलाव सुरु करणे, तसेच सन २००८ ते २००१९ या कालावधीतील व्याजाची रक्कम रु.१७,४२,०३२/- दोन वर्षामध्ये दोन सम हप्त्यांमध्ये महानगरपालिकेमध्ये भरण्यास, बंद कालावधी सन २०१९-२० पासून २०२२-२३ पर्यंतचे भाड्याची रक्कम व त्यावरील व्याज रक्कम

रु.३४,१५,५४५/- माफ करणेस व बंद कालावधी मधील ५ वर्ष करारनामाच्या मुळ मुदतीतध्ये वाढून देणेकामीच्या प्रस्तावास महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२)नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वि.वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.४ च्या कार्यक्षेत्रात कै.परशुराम टावरे क्रिडा संकुलनामधील महानगरपालिका तरण तलाव स्पोर्टीव्ह फिटनेस सेंटर, भिवंडी यांना ३० वर्षाकरीता परिचलन करणेकामी दिलेले आहे. सदर तरण तलावामध्ये अपघात झाल्याने दि.१३.०२.२०१९ रोजी सदर तरण तलाव सिल करण्यात आलेले आहे. सदर तरण तलाव व्ही.जे.टी.आय. अभियांत्रिकी महाविद्यालय, मुंबई यांचे सुरक्षीतता ऑडिट नुसार दुरुस्ती केलेली असल्याने तरण तलाव सुरु करणे, तसेच सन २००८-२००९ ते २०१८-२०१९ या कालावधीतील व्याजाची रक्कम रु.१७,४२,०३२/- दोन वर्षामध्ये दोन सम हप्त्यांमध्ये महानगरपालिकेमध्ये भरण्यास, बंद कालावधी सन २०१९-२० पासून २०२२-२३ पर्यंतचे भाड्याची रक्कम व त्यावरील व्याज रक्कम रु.३४,१५,५४५/- माफ करणेस व बंद कालावधी मधील ५ वर्ष करारनामाच्या मुळ मुदतीतध्ये वाढून देणेकामीच्या प्रस्तावास मा.प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**(अजय वि. वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**